# सृष्टिज्ञान : ५० वर्षांपूर्वी

## (सप्टेंबर १९७३, वर्ष ४६वे, अंक १०, क्रमांक ५५०)

या अंकात संपादकीय व इतर १२ लेख आहेत. संपादकीय मध्ये भारत व चीनमध्ये विज्ञान प्रसार कसा होतो याविषयीची उद्बोधक माहिती आहे. भारतीय विमानदल हा शालिनी भिडे यांनी लिहिलेला लेख, सौ. वंदना गाडगीळ यांच्या कार्यक्रमा वर आधारित आहे. यामध्ये भारतीय विमान दलाची झालेली प्रगती आणि त्यांनी वापरलेल्या वेगवेगळ्या प्रकारच्या विमानांची जसे की ट्रेनर, फाइटर, बॉम्बर, ट्रान्सपोर्टर, हेलिकॉप्टर व नेव्हल हेअर क्राफ्ट बद्दल माहिती आहे. त्यानंतरही वायुसेनेत नवीन नवीन विमानांची म्हणजेच व्हंपायर F-139, मिग, नॅट, HT-2 इ. विमानांविषयी माहिती आहे.

सतीश कुलकर्णी यांनी लिहिलेल्या ''शोलिंग फिशेस् किंवा थव्याने राहणारे मासे'' ह्या लेखात एकत्र राहणाऱ्या माशांचे विषयी माहिती आहे. उदा. हेरिंग्ज, सारडाईन, अँकोव्होज, मॅकरेल्स, स्प्रॅट्स वगैरे. हे मासे नेहमीच कसे एकत्र राहतात आणि एकत्रच सगळीकडे फिरतात त्या विषयी सांगितले आहे.

नलिनी गुंजटकर यांनी त्यांच्या पाण्यातील तृणकांचा प्रश्न या लेखात अनेक प्रकारच्या उपद्रवी पाणवनस्पतीं विषयी लिहिले आहे. डेव्हिल्स लीलॅक, मिलियन डॉलर, टेरर ऑफ बंगाल, वॉटर हायसिंथ, आफ्रिकन पायल ही भारतात आढळणारी पाण्यातील तृणके आहेत. जल वाहतुकीत व मच्छीमारी सारख्या व्यवसायात त्या कसे अडथळे निर्माण करतात आणि त्यामुळे कसे प्रदूषण होते याचीही माहिती आहे.

निरंजन घाटे यांनी विज्ञानवार्ता या लेखात ४ गोष्टींबद्दल सांगितले आहे. अणुगर्भिय उर्जेवर चालणाऱ्या पेसमेकर नावाच्या यंत्राची माहिती दिली आहे. कमजोर हृदय असलेल्या व्यक्तींना ह्या पेसमेकरमुळे चांगले आयुष्य जगता येते. डॉक्टर जॉन रस्ट यांनी कोंबड्यांची अनुधुलीला प्रतिकार करण्याची शक्ती असते असे दाखवून दिले. दहा लाख वर्षांपासून मानव कासवे खात होता असे पुरावे मिळाले आहेत. ताऱ्यांची संख्या हळूहळू कमी होते आहे असे डॉक्टर मार्टेन स्मिड यांनी संशोधनाअंती शोधले. गॅस शेगडी ऐवजी वापरता येणारी एक सुविधा या लेखांमध्ये नेहमीची एलपीजी गॅस शेगडी खूप महाग पडते म्हणून त्याऐवजी काही स्वस्त यंत्रणा तयार करता येते का यावर किर्लोस्करवाडीच्या श्री.टोकेकर यांनी नेहमीच्या वापरातला स्टोव्हची रचना बदलून असे करता येते असे हे दाखवले.

''जलप्रदूषण'' या वसंत श्रीधर लोंढे यांनी लिहिलेल्या लेखात जलप्रदूषणातील धोके सांगितले आहेत. कारखान्यातून निघालेले दूषित पाणी, शहरी भागातून निघालेले सांडपाणी, आणि तेलवाहू जहाजांच्या प्रवासातील झालेल्या गळतीमुळे अनेक प्रकारचे आरोग्य विषयक धोके निर्माण होतात.

अलबिनिझम अर्थात प्राण्यांमधील श्वेतत्व या लेखांमध्ये श्री. प्र. के. घाणेकर यांनी अनुवंशिक गुणसूत्रांच्यामुळे काही वेळेला पांढरे कावळे किंवा पांढरे वाघ कसे सापडतात हे सांगितले आहे. अलबिनो म्हणजे पेशीमध्ये असणाऱ्या रंगद्रव्यांचा अभाव.

विज्ञान शिक्षकाच्या व्यथा हा द्वा. वा. केळकर यांचा अभ्यासपूर्ण लेख आहे. प्रयोग शाळा नसणे, नेमक्या शैक्षणिक धोरणाची माहिती, आणि ते राबविणार्या चालक संस्थाची अनास्था, विज्ञानाची, उपकरणांची माहिती असणारे सहाय्यक नसणे, इ. इ. अडचणींची माहिती दिली आहे.

मानाचा मुजराया लेखांमध्ये प्रा. प्रभाकर सोवनी यांनी मेघनाथ साहा, होमी जहांगीर भाभा, हेन्री कॅव्हेंडिश, इव्हँगेलिस्टा टॉरिसेली आणि नील्स बोहर यांनी विज्ञानात केलेल्या कामगिरीविषयी माहिती दिली आहे.

द. रा. कापरेकर ह्या प्रसिद्ध गणित तज्ञांनी १ ते ९ अंक त्रिकोणावर घालण्याचे कोडे या लेखात त्रिकोण वापरून वेगवेगळी गणिती कोडी सांगितली आहेत.

पुस्तक परिचय ह्या लेखांमध्ये श्री. आर. एन. रायकर यांनी इमारत– दुरुस्ती शास्त्रावर आदर्श तांत्रिक पुस्तक "Technology of Building Repairs" याविषयी माहिती दिली आहे.

◆

**अशोक तातुगडे**
मोबा. ७०५७५४५७६९